# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१

ई-मेल आयडी :- comscea.pune@maharashtra.gov.in
secscea.pune@maharashtra.gov.in

जा.क्र.रासनिप्रा/ड वर्गकृतीकार्यक्रम/लोकमान्यएसआरएमुंबई/कोर्टकेस/२०१४ /६२० दि.३०/१०/२०१४

**तात्काळ/न्यायालयीन प्राधान्य**

प्रति,

जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी
तथा सहनिबंधक, सहकारी संस्था,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व)
मुंबई ४०० ०५१

**विषय : संस्थेची निवडणूक घेणेबाबत...**
**लोकमान्य एस.आर.ए.सहकारी गृहनिर्माण संस्था, मर्या. खार (पूर्व) मुंबई ४०० ०५१.**

**संदर्भ :** १. मा.सहकार न्यायालय, मुंबई येथे दाखल अपिल डिस्प्युट क्र.सीसी/२/१८०/२०१२ दिनांक १५/०४/२०१३.
२. श्री.तुकाराम गावडे व इतर यांनी मा.उच्च् न्यायालयामध्ये दाखल केलेली अवमान याचिका क्र.११८/२०१४
३. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७३ कब
४. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम २०१४

उपरोकत विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

२/- प्रस्तुत प्रकरणी कळविण्यात येते की, लोकमान्य एस.आर.ए.सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. सी.टी.एस.नं.१६,१६८,१६९,१७०,१७३ साईबाबा रोड, जवाहर नगर खार (पूर्व) मुंबई ही संस्था दिनांक १२/०५/०५ रोजी नोंदणी करण्यात आली आहे. संस्थेने दिनांक ३१/७/११ रोजी आयोजित सर्व साधारण सभेत सन २०१०-११ ते २०१५-१६ या कालावधीसाठी संस्थेची व्यवस्थापन समितीची निवड केली होती. सदर निवडीबाबत श्री.तुकाराम गावडे व इतर यांनी मा.सहकार न्यायालयामध्ये अपिल दाखल केले होते. त्यावर मा.सहकार न्यायालयाने दिनांक १५/४/१३ रोजी अंतिम आदेश देऊन संस्थेस व्यवस्थापन समितीची निवडणूक घेणेबाबत आदेशित केले होते. मा.सहकार न्यायालयाचे सदर आदेशा विरुद्ध नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी मा.सहकार अपिल न्यायालय मुंबई येथे अपिल दाखल केले होते. सदर अपिल मा.सहकार न्यायालयाचे दिनांक ०२/०७/१३ चे आदेशान्वये नाकारण्यात आले असून संस्थेची निवडणूक घेणेबाबत आदेशीत केले आहे.

मा.सहकार न्यायालयाचे आदेशानुसार संस्थेची निवडणूक न घेतल्याने श्री.तुकाराम गावडे यांनी मा.उच्च् न्यायालयामध्ये अवमान याचिका क्र.११८/२०१४ दाखल केली असून त्याची सुनावणी सुरू आहे.

सबब लोकमान्य एस.आर.ए.सहकारी गृहनिर्माण संस्था, मर्या. खार (पूर्व) मुंबई ४०००५१ या संस्थेबाबत मा.न्यायालयाकडील आदेश व मा.न्यायालयामध्ये सादर केलेली अवमान याचिका विचारात घेता संस्थेची निवडणूक तात्काळ घेणे क्रमप्राप्त झाले आहे.

या संस्थेची निवडणुक महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, नियम १९६१ व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) २०१४ मधील तरतुदी तसेच संस्थेचे मंजूर उपविधीप्रमाणे पार पाडणे आवश्यक आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत.

## आ दे श

लोकमान्य एस.आर.ए.सहकारी गृहनिर्माण संस्था, मर्या. खार (पूर्व) मुंबई या संस्थेच्या निवडणुकीसाठी श्री. प्रमोद कुलकर्णी, सहाय्यक सहकारी अधिकारी, अधिन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांची नियुक्ती प्राधिकृत अधिकारी /निवडणुक निर्णय अधिकारी म्हणुन नियुक्त करण्यात येत आहे. **तसेच उक्त नियुक्त अधिकारी यांनाच संबंधीत संस्थेच्या नियम महाराष्ट्र सहकारी (समिती निवडणुक) २०१४ नियम ७७ नुसार पदाधिकारी निवडीच्या सभेस प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्त करण्यात येत आहे.**

नियुक्त प्राधिकृत अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० नियम १९६१, महाराष्ट्र सहकारी (समिती निवडणुक) २०१४ व संस्थेचे मंजूर उपविधीतील तरतुदीनुसार त्वरीत निवडणुक प्रक्रीया सुरू करावी.

**मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मान्यतेने व निर्देशाप्रमाणे.**

**(डॉ. आनंद जोगदंड)**
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य, पुणे

**प्रत :** माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव संबंधित सर्व तालुका सहकारी निवडणुक अधिकारी